**प्रेसनोट दि.१८/०४/२०२४.**

**सोलापूर शहर गुन्हे शाखेकडुन, वाहन चोरीचे एकूण ०४ गुन्हे उघड.**

---

अ) दिनांक ११/०४/२०२४ रोजी रात्री, १०.०० वा ते दि.१२/०४/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा दरम्यान, फिर्यादी- मंगेश भारत जाधव, रा.फ्लॅट नंबर ३०२, सनसिटी, विंग बी - २, सोलापूर यांची **टोयोटो कंपनीची ग्लांझा कार क्रमांक- एम.एच १३ डी.टी २४४८** ही, त्यांचे राहते अपार्टमेंन्टचे पार्कींग मधून, अज्ञात चोरटयाने चोरी केली होती. त्याबाबत, फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२४०/२०२४ भा.द.वि.क.३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे.

त्याअनुषंगाने, गुन्हे शाखेकडील सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट देवून, आजुबाजुचे सुमारे २० सी सी टी व्हि फुटेज ची पडताळणी करून, अज्ञात आरोपीची ओळख पटविली. त्यानंतर, गुप्त बातमीदार मार्फत, सदरची कार चोरी करणारा **रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे- विकी दशरथ गायकवाड, वय-२५ वर्ष, रा.सेटलमेंन्ट फ्रि कॉलनी नंबर -०६, कृष्ण मंदिर जवळ, सोलापूर** यास दि.१५/०४/२०२४ रोजी, तो सदरची कार विक्री करीता घेवून आला असताना त्यास ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी त्याचेकडून, चोरीस गेलेली **टोयोटो ग्लांझा कार क्रमांक एम एच १३ डी टी २४४८** एकुण किंमत रूपये २,५०,०००/- ची जप्त केली आहे.

ब) त्याचप्रमाणे, दि.१४/०४/२०२४ रोजी, पोउपनि/अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकास, गोपनिय बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीप्रमाणे **इसम नामे - सिध्दाराम चंद्रशा हिरकूर, वय ३६ वर्षे, सध्या रा. प्लॉट नं. १५, राघवेंद्र नगर, मजरेवाडी, सोलापूर** यास ताब्यात घेवून, त्याचेकडून सदर बझार पोलीस ठाणे गु.र.नं.२७०/२०२४ भादंवि ३७९ अन्वये, दाखल गुन्हयातील चोरीस गेलेली होंडा शाईन कंपनीची ३५,०००/- रू. किंमतीची **मोटार सायकल क्र. MH 13 DG 4009** ही जप्त करण्यात आली आहे.

पोउपनि/अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी मिळालेल्या गोपनिय बातमीचे आधारे इसम नामे - **राजकुमार उर्फ राजु शिवानंद विराजदार, वय ३९ वर्षे, सध्या रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर, कायम रा. २४, दर्गनहळ्ळी, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर** यास ताब्यात घेवुन, त्याचे ताब्यातुन सदर बझार पोलीस ठाणे गु.र.नं.२३८/२०२४ भादंवि ३७९ अन्वये, दाखल गुन्हयातील चोरीस गेलेली ॲक्टीव्हा कंपनीची २५,०००/- रू किंमतीची **मोटार सायकल क्र. MH 13 AG 6779** जप्त करून, सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

क) त्याचप्रमाणे, दिनांक १३/०४/२०२४ रोजी, फिर्यादी- सुशांत चंद्रकांत लोखंडे यांची, यामाह कंपनीची आर-१५ मोटार सायकल क्रमांक एम.एच.१३ डी.जे.७०७० ही, त्यांचे राहते घरापासून चोरी झाली होती. त्याप्रमाणे, जोडभावी पेठ पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गु.र.नं.१९४/२०२४ भा.द.वि.क.३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे.

दिनांक १५/०४/२०२४ रोजी, सपोनि/दादासो मोरे व त्यांचे तपास पथकास गोपनिय बातमीदारा मार्फत मिळालेल्या बातमीचे आधारे, इसम नामे- **मोहम्मद शरीफ बागवान, वय-२६ वर्षे, रा.३७०/२०, मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर** यास ताब्यात घेवून, त्याचेकडून यामाह कंपनीची आर-१५ कंपनीची ०१,००,०००/- रू. किंमतीची **मोटार सायकल क्रमांक एम.एच.१३ डी.जे.७०७०** जप्त करणेत आली आहे.

**अशा प्रकारे, वरील नमूद ०४ आरोपींकडून, ०१ कार आणि ०३ मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस येवून, एकूण ०४,१०,०००/- रू किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत आला आहे.**

सदरची कामगिरी, मा. श्री.एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/वि.शा.), श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि./संजय क्षिरसागर, स.पो.नि./दादासो मोरे, पो.उप.नि./अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner